# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४
## शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा - २०२५
## प्रसिध्दी निवेदन

महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५** या परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. सदर परीक्षेचे आयोजन **२४/०५/२०२५ ते दि. ०५/०६/२०२५** प्रविष्ठ उमेदवारांच्या संख्येनुसार व उपलब्ध भौतिक सुविधेनुसार यामध्ये बदल झाल्यास परिषदेच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल असे दि. **२५/०४/२०२५** च्या अधिसूचनेद्वारे कळविण्यात आले होते.

त्यानुसार **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५ परीक्षा** घेण्याचे नियोजन **दि. २७/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५ व ०२/०६/२०२५ ते ०५/०६/२०२५** या कालावधीत करण्यात आलेले आहे. सदर परीक्षेचे प्रवेशपत्र लवकरच उमेदवारांना देण्यात येतील. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत वेळोवेळी दिलेल्या, प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या तसेच परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेतील सूचनांचे उमेदवारांनी काटेकोरपणे पालन करावे.

**ठिकाण: पुणे**
**दिनांक: २३/०५/२०२५**

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४

Scanned with OKEN Scanner